# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# दानिएल आणि सिंहाची गुहा


लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Mary-Anne S.



60 गोष्टींतील 34 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

दारायावेश हा बाबेलचा नविन राजा होता. तो हुशार व चलाख राजा होता. त्याने त्याच्या राज्यातील एकशेंवीस उत्कृष्ट लोकांची निवड करुन त्याने त्यांना राज्यकारभार चालविण्यास हाती घेतले.



1

आणि मग त्याने तिन जणांना त्यांच्यावर प्रमुख नेमले, त्या तिघांपैकी दानिएल हा एक होता.



2

दारयावेश राजा दानिएलचा फार सन्मान करित असे, त्याला सर्व राज्यावर नेमावे असा राजाचा विचार होता.



3

इतर पुढाऱ्यांना याचा हेवा वाटला. दानिएलला राजासमोर अडचणीत आणता यावे म्हणून ते दानिएलमध्ये काही चुका शोधण्याचा प्रयत्न करु लागले.



4

त्यांनी कितीही प्रयत्न केला तरी या पुढाऱ्यांना दानिएलमध्ये काहीही चुक आढळली नाही. दानिएल जे काही करी त्या सर्वांत तो राजाबरोबर खरे वागे. तसेच तो सावधगिरी बाळगून आपले सर्व काम हुशारीने त्याला जितके अधिक चांगले करता येईल तितके करी.



5

दानिएलला अडचणीत पकडण्यासाठी केवळ एकच मार्ग होता हे त्या हेवा करणाऱ्या पुढाऱ्यांना माहित होते. इस्त्राएलच्या देवाची भक्ति करण्यास या जगातील कोणीही दानिएलला थांबवू शकत नाही हे त्यांना माहित होते.



6

दानिएलच्या विरोधकांनी एक योजना तयार केली. राजाने मंजुर करावा असा त्यांनी एक नविन कायदा तयार केला. त्या कायद्यात असे म्हटले होते की प्रत्येकाने केवळ दारयावेश राजाचीच आराधना करावी. जो कोणी आज्ञाउल्लंघन करिल त्याला सिंहाच्या गुहेत टाकण्यात यावे !




7

दारयावेश राजाने नविन कायद्यावर सहि केली.



8


नविन कायद्यामुळे दानिएलवर काहीएक फरक पडला नाही. तो जी गोष्ट हमेशा करित होता तीच त्याने केली. त्याने त्याच्या घराची खिडकी उघडी ठेवून दिवसातून तिन वेळा स्वर्गीय देवाची प्रार्थना केली.
9


हेव्याने भरलेले पुढारी लगबगीने हि गोष्ट राजाला सांगण्यास गेले. दानिएलला अटक करण्याशिवाय दारयावेश राजाकडे दुसरा पर्याय नव्हता. कायद्याचे पालन होणे आवश्यक होते.
10


दानिएलला आता मरावे लागणार होते. कायद्यामध्ये काही बदल होऊ शकतो का याविषयी राजाने पुष्कळ प्रयत्न करुन पाहिले, परंतू राजा काहीही करु शकला नाही.
11


दानिएलला सिंहाच्या गुहेत टाकून मारण्याची शिक्षा सुनावण्यात आली. उपाशी सिंहांच्या गुहेत टाकण्याच्या आधि, राजाने दानिएलला म्हटले, "ज्या देवाची तूं नित्य सेवा करितोस तो तुला सोडविल !"
12


त्या रात्री राजाची झोप उडाली होती. दुसऱ्या दिवशी मोठ्या पहाटेस राजा त्वरेने सिंहांच्या गुहेजवळ गेला.
13


दारयावेश राजा गुहेजवळ जाऊन शोकस्वराने ओरडला, "हे दानिएला, जिवंत देवाच्या सेवका, ज्या देवाची तूं नित्य सेवा करितोस त्याला सिंहांपासून तुला सोडविता आले आहे काय?" परत उत्तर येईल अशी त्याने कदाचित अपेक्षा केली नसेल. परंतू दानिएलने उत्तर दिले !
14

दानिएल राजास म्हणाला, "महाराज, माझ्या देवाने आपला दिव्यदूत पाठवून सिंहांची तोंडे बंद केली आहेत; त्यांनी मला कांहीएक उपद्रव केला नाही; व महाराज आपलाही मी काही अपराध केला नाही."



15

तेंव्हा दारयावेश राजा फार आनंदीत झाला ! त्याने दानिएलला गुहेतून बाहेर काढण्याची आज्ञा केली.



16

देवाने दानिएलला वाचवले आहे आणि दानिएलचे शत्रू ते देवाचे शत्रू आहेत हे राजाला कळले होते. ज्यांनी राजाला वाईट कायद्यावर सही करण्यास फसवील होते त्या सर्वांना राजाच्या आज्ञेवरुन सिंहांच्या गुहेत टाकण्यात आले. सिंहांनी त्यांना खाऊन टाकले.



17

स्वर्गीच्या देवाने त्याचा विश्वासू सेवक दानिएल याला वाचवले आहे हे सर्व जगाला कळावे अशी दारायावेश राजाची इच्छा होती. राजाने एक पत्र लिहीले त्यात सर्वांनी केवळ जिवंत देवाचीच भक्ति करावी असा आदेश देण्यात आला होता. आणि राजाने दानिएलला पुन्हा त्याच्या पदावर आणि सन्मानास चढविले.



18

दानिएल आणि सिंहाची गुहा

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

दानिएल ६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!